# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
## पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११ ००५

**MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,**
**PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005**

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781 / 82 / 83
25536712 (OFF)

E-MAIL
sscboardpune@gmail.com


**परीक्षा प्राधान्य महत्त्वाचे-**

जा.क्र.पुविमं/उमा-अ/ 10064
पुणे ४११ ००५
दिनांक-०७/१०/२०२६

प्रति,
प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा-पुणे, अ.नगर, सोलापूर

**विषय- उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी फेब्रुवारी-मार्च २०२७ परीक्षेच्या आवेदनपत्रांबाबत FYJC चा उर्वरित डेटा व सैनिक शाळा/विद्यानिकेतन/आदिवासी आश्रमशाळा, MCVC तसेच ITI तसेच कनिष्ठ महाविद्यालय बदल/नवीन प्रवेश किंवा तांत्रिक कारणांमुळे आवेदनपत्र भरण्याच्या सूचनांबाबत ...**
**संदर्भ-** क्र.रा.मं/गणकयंत्र/१५०/४१०८ दि.०२.१०.२०२६

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी फेब्रुवारी-मार्च २०२७ ची आवेदनपत्र भरण्याची नियमित शुल्काची तारीख ही ३० ऑक्टोबर २०२६ असून अद्यापही ब-याच कनिष्ठ महाविद्यालयांनी आवेदनपत्रे भरलेली नाहीत, ही बाब अत्यंत गंभीर असून आवेदनपत्रे तात्काळ भरावीत.

याबाबत राज्य मंडळाच्या संदर्भिय पत्रानुसार,

१) FYJC चा उर्वरित विद्यार्थी डेटा - शाळा बदल ,कनिष्ठ महाविद्यालय बदल,नवीन प्रवेश किंवा तांत्रिक कारणांमुळे ज्या विद्यार्थ्यांचा डेटा ऑनलाईन प्रणालीवर उपलब्ध नाही अशा विद्यार्थ्यांचा संपूर्ण डेटा विहीत एक्सेल (Excel) नमुन्यात सोमवार दि.१२.१०.२०२६ रोजी मंडळ कार्यालयात समक्ष जमा करावा. (हार्ड कॉपी व एक्सेल सॉफ्ट कॉपी -पेन ड्राईव्हमध्ये)

| Sr. No | Self HSC Index | College UDISE No. | Student Full Name | | | | DOB YY-MM-DD | SSC Seat No | SSC Result | | Passed SSC Board Name | Reason |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | F Name | Father Name | S Name | Mother Name | | | Month | Year | | |
| E. g. | 1101001 | 27320100144 | AAAAAAA | BBBBBBB | CCCCCCCC | DDDDDD | 2009-09-02 | C004604 | FEB or MAY | 2025 | MSBSHSE / CBSC/ICSC | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |

(पत्रासोबत Excel नमुना जोडत आहोत.)

ऑफलाईन संदर्भातील महाविद्यालयांकडून सदरील दिनांकास प्राप्त झालेले प्रस्ताव शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडे विभागीय मंडळाकडून खातरजमा करण्याकरिता पाठविले जातील, सदरील प्रस्तावांची शिउसं कार्यालयाने खातरजमा केल्यानंतरच विद्यार्थ्यांना आवेदनपत्र भरावयाची कार्यवाही करता येईल,याची नोंद घ्यावी.

२) सैनिक शाळा, विद्यानिकेतन व आदिवासी आश्रमशाळा/ **MCVC** तसेच **ITI** शाळांबाबत-
MCVC तसेच ITI विद्यार्थ्यांप्रमाणेच सैनिक शाळा, विद्यानिकेतन व आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचा डेटा FYJC प्रणालीमध्ये असल्याने त्यांना थेट (Direct) आवेदनपत्र भरण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे.

अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी विशेषत: आदिवासी समाजकल्याण विभागाच्या कनिष्ठ महाविद्यालय यांनी खालील तक्त्यात माहिती सोमवार दि.१२.१०.२०२६ रोजी समक्ष मंडळ कार्यालयात सादर करावी. *(कृ.मा.प.)*

| कॉलेज इंडेक्स नंबर | मंडळ मान्यता वर्ष | तुकडी मान्यता संख्या | गतवर्षी २०२५-२६ परीक्षेत प्रविष्ठ केलेली विद्यार्थी संख्या | दि.०६.१०.२०२६ पर्यंत भरलेले एकुण इ.१२ वी चे फॉर्म | प्रवेश क्षमता (Intake) | इ.१२वी मध्ये सध्याची प्रविष्ठ विद्यार्थी संख्या (faculty -wise) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ५ | ६ |
| | | | | | | |

*(कृ.मा.प.)*

याशिवाय उपरोक्त १ व २ मध्ये नमूद सर्व कनिष्ठ महाविद्यालयांनी यादी सादर करताना त्या प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे सादर करावे.

१. तुकडी मान्यता
२. मंडळ मान्यता
३. विषय मान्यता

उपरोक्त प्रमाणे गांभीर्याने नोंद घेऊन मुदतीत कार्यवाही करावी. याबाबत हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यास विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र अथवा विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्यास कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

MBRaut
(डॉ.मीनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे- ४११ ००५